# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२२

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील रेवस ग्रामपंचायत हद्दीतील कोळी समाजाच्या जागेतील ७/१२ उताऱ्यामधील इतर हक्कमधील नोंदी बदलणेबाबत

**(१) १०८३६ (०५-०१-२०२२) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत सारळचे विभाजन होऊन सुमारे सन १९६३ मध्ये रेवस ग्रामपंचायतीची नव्याने निर्मिती करण्यात आली, सारळ ग्रामपंचायतीचे विभाजन होण्यापूर्वी रेवस गावातील मच्छिमारांना जाळी विणने, मच्छी सुकविणे, नौकांची दुरुस्ती करणे तसेच नौका ठेवण्यासाठी तसेच स्मशानभूमीसाठी गट नं.६२ ही जागा रेवस गावातील कोळी समाजाच्या पंच कमिटीच्या नावे करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गट नं. ६२ या जागेच्या ७/१२ उताऱ्यामध्ये इतर हक्क म्हणून ग्रुप ग्रामपंचायत सारळ हे नाव असल्यामुळे सारळ ग्रामपंचायत सदर जागेत हक्क बजावत असल्यामुळे रेवस ग्रामपंचायत हद्दीतील मच्छीमारांना अनेक समस्यांना समोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गट नं.६२ या जागेच्या ७/१२ उताऱ्यामध्ये इतर हक्क म्हणून ग्रुप ग्रामपंचायत सारळ हे नाव असून आता रेवस ग्रामपंचायतीची निर्मिती झालेली असल्यामुळे इतर हक्क म्हणून ग्रुप ग्रामपंचायत रेवस हे नाव असण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गट नं. ६२ या जागेच्या ७/१२ उताऱ्यामधील इतर हक्कामध्ये असलेली ग्रुप ग्रामपंचायत सारळ हि नोंद बदलून त्याऐवजी ग्रुप ग्रामपंचायत रेवस अशी नोंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१३-०९-२०२२) :** (१), (२), (३), (४) व (५) ग्रुप ग्रामपंचायत सारळ ता.अलिबाग, सजि.रायगड या ग्रुप ग्रामपंचायतीचे विभाजन होऊन सन १९६३ मध्ये रेवस ग्रामपंचायतीची नव्याने निर्मिती करण्यात आली आहे. मौजे सारळ, ता.अलिबाग येथील ग.नं.६२ क्षेत्र १-६३.०० हे. आर ही मिळकत फेरफार क्र. २८ दिनांक ०६/०९/१९९० अन्वये रेवस येथील पंचांच्या नांवे दाखल करण्यात आली आहे. सदर नोंद व सक्षम प्राधिकारी यांची पूर्व परवानगी न घेता दाखल केली असल्याने उक्त फेरफार क्र.२८ हा महाराष्ट्र जमीन महसूल २ संहिता, १९६६ चे कलम २५८ अन्वये कामकाज चालवून व

नियमोचित कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याबाबत उपविभागीय अधिकारी, अलिबाग यांना जिल्हाधिकारी, रायगड यांनी दिनांक ४ जानेवारी, २०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

सारळ या महसूली गावामधून दत्तपाडा या वाडीचे स्वतंत्र महसूली गावामध्ये रुपांतर झाले आहे. मौजे सारळ, ता.अलिबाग जि.रायगड येथील ग.नं/६२/ क्षेत्र १-६३.०० हे.आर म्हणजेच सध्याचा मौजे दत्तपाडा, ता.अलिबाग, जि.रायगड येथील ग.नं.१६, क्षेत्र १-६३.०० हे. आर असून, दत्तपाडा हे गाव आजरोजी सारळ ग्रामपंचायतीमध्ये समाविष्ट आहे.

---

## सावनेर (जि.नागपूर) तालुक्यातील पाणंद रस्त्यांची दुरूस्ती करण्याबाबत

**(२) १३५९१ (०१-०६-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावनेर (जि.नागपूर) तालुक्यातील बहुतांश पाणंद रस्ते गेल्या अनेक वर्षापासून दुर्लक्षित राहिल्याने त्यांची दुरवस्था झाली असून ते वहिवाटीस योग्य नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाणंद रस्त्यांची दुरूस्ती करून देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांचेसह शासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीच्या अनुषंगाने सावनेर तालुक्यातील पाणंद रस्त्यांची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (०२-०९-२०२२) :** (१) होय हे खरे आहे.

(२) होय हे खरे आहे.

(३) सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाकरीता दिनांक २५/०१/२०२२ रोजीच्या शासन निर्णयात शेत/पाणंद रस्त्यांच्या आराखड्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच सन २०२२-२३ करीता शासन निर्णय दिनांक ०३/०३/२०२२ व दिनांक २७/०४/२०२२ नुसार ८३ कि.मी. सावनेर तालुक्यातील शेत/ पाणंद रस्त्यांच्या आराखड्यास मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ अभियांत्रिकी विभागातील कामे कंत्राटदारांना विनानिविदा दिल्याबाबत

**(३) १३६९७ (०७-०७-२०२२) श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ अभियांत्रिकी विभागातील ३ कोटी ३८ लाख रुपयांची कामे बेकायदेशीर पध्दतीने कंत्राटदारांना दिल्याचे माहे एप्रिल, २०२२ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक मा.लोकप्रतिनिधींनी सदरहू कामांवर संशय व्यक्त केला असून सुमारे ५ ते ६ कंत्राटदारांना सदरहू कामे दिल्याचा आरोप केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित बेकायदेशीर कामे करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (१८-०८-२०२२) :** (१) खरे नाही.

सदर "कामाचा विस्तार" बाबतच्या कामास व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेण्यात आली होती. त्यानुसार सदर कामाकरीता ई-निविदा प्रक्रिया राबवून लघुत्तम निविदा धारकद्वारे कामे करण्यात आलेली आहेत.
(२) खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना थकबाकी व उपदानासह सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबत

**(४) १४००१ (२७-०६-२०२२) श्री.नागोराव गाणार, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके : तारांकित प्रश्न क्रमांक १२८४५ ला दिनांक १५ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील १०४ विनाअनुदानित शाळांना १०० टक्के अनुदान, खाजगी अनुदानित प्राथमिक शाळांतील ३९०० शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना थकबाकी व उपदानासह सातवा वेतन आयोग लागू करण्यासह इतर मागण्यांबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेने अंमलबजावणी केली नसल्याने सदरहू शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आपल्या मूलभूत हक्कांपासून वंचित राहिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २००१-२००२ या शैक्षणिक वर्षापासून बृहन्मुंबई महानगरपालिकेने त्यांच्या क्षेत्रात मान्यता दिलेल्या खाजगी प्राथमिक शाळांचे अनुदान यापुढील कालावधीत राज्य शासनाच्या अनुदानासाठी ग्राह्य धरले जाणार नसल्याचे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू १०४ शाळा २००१-२००२ पुर्वीच्या असून शासन आणि महानगरपालिका यांच्यामध्ये समन्वय नसल्याने हजारो शिक्षकांना आर्थिक समस्येला सामोरे जावे लागत असल्याने याबाबत कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत,
(४) तसेच, उक्त १०४ शाळांना मान्यता देण्याकरीता मनपाने प्रथम शाळा सुरु करावी त्यानंतर मान्यता प्रदान करुन अनुदान देण्यात येईल असे आश्वासन दिले असून त्याबाबत अंमलबजावणी न करण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (१२-०८-२०२२) :** (१), (२), (३), (४) व (५) सन २००१-०२ या शैक्षणिक वर्षापासून बृहन्मुंबई महानगरपालिकेने त्यांच्या स्तरावरुन मान्यता दिलेल्या खाजगी प्राथमिक शाळांना यापुढील कालावधीत राज्य शासनाच्या ५० टक्के अनुदानासाठी ग्राह्य धरले जाणार नसल्याचे शासन स्तरावरुन आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे.

शासन निर्णय, दिनांक ७ जुलै, २०१५ अन्वये महानगरपालिकांना प्राथमिक शिक्षणावरील मान्य बाबींवरील खर्च भागविण्यासाठी ५० टक्के अनुदान अनुज्ञेय आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राथमिक शिक्षणावरील मान्य बाबींवरील खर्च भागविण्यासाठी ५० टक्के अनुदान अनुज्ञेय आहे. त्यानुसार अनुदान मंजूर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## प्रयोगशाळा सहाय्यक व प्रयोगशाळा परिचर यांना चौथ्या, पाचव्या व सहाव्या वेतन आयोगाच्या वेतन श्रेणीतील त्रुटी व विसंगती दूर करण्याबाबत

**(५) १४००७ (०१-०७-२०२२) श्री.नागोराव गाणार, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रवीण दटके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उच्च व तंत्र शिक्षण विभागाने शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी सुधारित वेतन शासन अधिसूचना (सुधारणा) दिनांक २४ मार्च, २०२२ रोजी निर्गमित केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याच धर्तीवर शालेय शिक्षण विभागाने प्रयोगशाळा सहाय्यक व प्रयोगशाळा परिचर यांच्या चौथ्या, पाचव्या व सहाव्या वेतन आयोगातील वेतन श्रेणीतील त्रुटी व विसंगती दूर करुन सुधारित वेतन संरचनाबाबतचा शासन आदेश दीर्घ कालावधीपासून निर्गमित केला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त विषयाबाबत महाराष्ट्र राज्य शैक्षणिक प्रयोगशाळा कर्मचारी महासंघ विभागीय कृती समिती, नागपूर तर्फे तसेच नागपूर विभागाच्या शिक्षक जन प्रतिनिधींनी शासनास दिनांक १० एप्रिल, २०२२ रोजी पत्र/निवेदन पाठवून सुधारित शासन आदेश निर्गमित करण्याची विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच उक्त महत्वाच्या विषयाबाबत निर्णय घेवून केव्हापर्यंत सुधारित शासन आदेश निर्गमित करण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (१६-०८-२०२२) :** (१) हे अंशतः खरे आहे.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून सातव्या वेतन आयोगाच्या अधिसूचना दिनांक ०८ डिसेंबर, २०२० मध्ये जळगाव विद्यापीठातील प्रयोगशाळा सहायक पदाची वेतनश्रेणी अनावधानाने कमी दर्शविण्यात आल्यामुळे, शासन अधिसूचना (सुधारणा) दिनांक २४ मार्च, २०२२ अन्वये फक्त जळगाव विद्यापीठातील प्रयोगशाळा सहायक पदाची वेतनश्रेणी सुधारित करण्यात आलेली आहे. उक्त नमूद अधिसूचना (सुधारणा) दिनांक २४ मार्च, २०२२ अन्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिनस्त इतर

सर्व महाविद्यालयातील प्रयोगशाळा सहायक संवर्गास सुधारित वेतनश्रेणी लागू केली नसल्याने त्रुटी दूर करण्याबाबत शासन आदेश निर्गमित करण्यात आलेला नाही.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) प्रधान सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या वेतनत्रुटी निवारण समितीने (२००९) प्रयोगशाळा सहायक संवर्गास सहाव्या वेतन आयोगानुसार लागू केलेल्या वेतनसंरचनेत त्रुटी नसल्याची शिफारस केल्याने शासन आदेश निर्गमित करण्यात आलेला नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयात संचमान्यता व शिक्षक मान्यता देण्याबाबत

**(६) १४३०६ (२७-०६-२०२२) श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयात संचमान्यता व शिक्षक मान्यता संबंधी सुसूत्रता आणण्यासाठी दिनांक २४/२/२००९ रोजीच्या शासन निर्णयानुसार शहरी भाग, शहरी ग्रामीण भाग, ग्रामीण भाग येथील विद्यार्थी संख्येच्या आधारावर संचमान्यता, तुकडी मान्यता, शिक्षक मान्यता देण्याचे नमूद केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याबाबतची वस्तुस्थिती तसेच स्वरूप काय आहे ?

**श्री.दिपक केसरकर (१२-०८-२०२२) :** (१) व (२) होय, तथापि, तद्नंतर बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार-२००९ च्या अनुषंगाने शासन निर्णय दिनांक २८ ऑगस्ट, २०१५ अन्वये संचमान्यतेचे सुधारित निकष निश्चित करण्यात आलेले आहेत.

---

## मौजे कोन्हाळी (ता.अक्कलकोट, जि.सोलापूर) येथील जल जीवन मिशन अंतर्गत नवीन पाणीपुरवठा योजना मंजूर झालेली निविदा रद्द केल्याबाबत

**(७) १४३१३ (०१-०७-२०२२) श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कोन्हाळी (ता.अक्कलकोट, जि.सोलापूर) येथील जल जीवन मिशन अंतर्गत नवीन पाणीपुरवठा मंजूर योजना निविदा उघडून रीतसर प्रक्रिया पूर्ण करून श्री.शिवराज कन्स्ट्रक्शन यांना ०.५१% लिटर दराने प्राप्त झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) श्री.शिवराज कन्स्ट्रक्शन यांना BOQ मध्ये चुका सांगून आपल्या मर्जीतल्या ठेकेदारांना काम न मिळाल्याने सदर निविदा कार्यकारी अभियंता यांनी हेतुपूरस्सर रद्द केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (१७-०८-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

जल जीवन मिशनच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रत्येक घरास नळजोडणी देणे तसेच SC प्रवर्गातील लोकवस्तीस प्रथम प्राधान्य देणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे सदर निविदा रद्द करून रमाबाई आंबेडकर या अंदाजे २०० मागासवर्गीय लोकवस्तीचा समावेश करणे आवश्यक होते. त्यामुळे सदर निविदा रद्द करण्यात आली होती.

यानंतर ठेकेदार, शिवराज कंन्स्ट्रक्शन यांनी निविदा रद्द करणेबाबत आक्षेप घेतला होता. त्यानंतर श्री.शिवराज कंन्स्ट्रक्शन यांच्या विनंतीवरून तक्रारीबाबत सुनावणी घेण्यात आली होती. त्यानंतर श्री.शिवराज कंन्स्ट्रक्शन यांनी निविदा रद्द केल्यामुळे हरकत नसलेबाबत दिनांक २२ मे, २०२२ अन्वये कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद यांना पत्र दिले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शिरगाव (ता.मावळ, जि.पुणे) येथील आमदार प्रकाश देवळे माध्यमिक विद्यालय, तसेच इतर शाळांच्या अनुदान वाढीबाबत

**(८) १४३२१ (०७-०७-२०२२) श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मावळ (पुणे) तालुक्यातील आमदार प्रकाश देवळे माध्यमिक विद्यालय, शिरगाव या शाळेसह इतर ५ शाळा ४० टक्के अनुदानासाठी विद्यार्थी संख्येअभावी अपात्र ठरवण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डोंगरी भागातील पटसंख्येच्या अटींच्या अधीन राहून अशा सर्व शाळांना सन २०१६ पासून मिळणारे २० टक्क्याचे अनुदान त्याच निकषावर वाढवण्याबाबत शासनाचे धोरण काय आहे,
(३) नसल्यास, त्याबद्दल आवश्यक दुरूस्ती शासन करणार आहे काय ?

**श्री.दिपक केसरकर (१२-०८-२०२२) :** (१), (२) व (३) “कायम” शब्द वगळलेल्या प्राथमिक/माध्यमिक शाळांना अनुदान सूत्र लागू करण्यासाठी मूल्यांकनाचे निकष शासन निर्णय, दिनांक १५ नोव्हेंबर, २०११ अन्वये निश्चित करण्यात आले असून त्यात शासन निर्णय, दिनांक १६ जुलै, २०१३ अन्वये सुधारणा करण्यात आली आहे. शासन निर्णय, दिनांक १६ जुलै, २०१३ मधील तरतूदीनुसार प्राथमिक /माध्यमिक शाळांचे मूल्यमापन करताना त्या शाळेत प्राथमिकच्या स्तरावर शेवटच्या वर्गात व माध्यमिक संदर्भात दहावीत किमान पटसंख्या ३० असेल व डोंगराळ व दुर्गम भागासाठी २० असेल अशी तरतूद आहे. त्यानुसार सदरहू शाळा त्रुटी पूर्ततेत पात्र असल्याचे आढळले आहे.

मा.मंत्रीमंडळाच्या दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० रोजीच्या बैठकीमध्ये यापूर्वी २० टक्के अनुदान घेत असलेल्या शाळांना दिनांक ०१ नोव्हेंबर, २०२० पासून वाढीव २० टक्के अनुदान देय करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

---

## राज्यातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत

**(९) १४४९० (०१-०७-२०२२) श्री.किरण सरनाईक, श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेवा निवृत्तीच्या वर्षात (दिनांक ०१ जुलै ते ३० जून) सहा महिन्यापेक्षा जास्त सेवा झाल्यास सेवानिवृत्त होणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यास एक वेतन वाढ देण्याची मागणी कर्मचारी सातत्याने करीत असल्याचे माहे मे, २०२२ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, राज्यातील सर्व शाळांमधील मुलांना मोफत गणवेश देण्याचा प्रस्ताव शिक्षण विभागाने वित्त विभागास पाठवला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, गणवेश व्यतिरिक्त मुलींना एक रूपयाऐवजी रूपये १० उपस्थिती भत्ता मिळावा, दिनांक ३० जून रोजी सेवानिवृत्त होणाऱ्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १ जुलैची वार्षिक वेतनवाढ मिळावी अशी मागणी प्राथमिक शिक्षक भारतीचे नवनाथ गेंड यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार राज्यातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (१६-०८-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे. तथापि, सदर प्रस्ताव वित्त विभागाने अमान्य केलेला आहे.

(३) व (४) हे खरे आहे.

उपस्थिती भत्ता या योजनेनंतर म्हणजे १९९२ नंतर मुलींची उपस्थिती वाढविण्यासाठी केंद्र/राज्य पुरस्कृत विविध नवीन योजना सुरु करण्यात आल्या आहेत. तसेच मानव विकास मिशन मार्फत मुलींना मोफत सायकल वाटप योजना व मोफत बस प्रवास योजना राबविण्यात येते. मुलींना १२ वी पर्यंत मोफत शिक्षण योजनाही राबविण्यात येत आहे. त्यामुळे उपस्थिती भत्ता योजना कालबाह्य झाली आहे.

तसेच ३० जून रोजी सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या १ जुलैची वार्षिक वेतनवाढीबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने केंद्र शासनामार्फत अद्याप कोणतेही आदेश निर्गमित करण्यात आलेले नाही. त्यामुळे राज्य शासनाच्या स्तरावर अद्याप धोरण निश्चित करता आलेले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गोंदिया जिल्ह्यात अवैध रेती चोरी करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(१०) १४५९४ (२३-०६-२०२२) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यात अवैध रेती तस्करांवर कारवाई करण्यात येत असली तरी रेती तस्करी थांबलेली नसून दिनांक ४ एप्रिलपासून जिल्ह्यातील महसूल कर्मचारी बेमुदत संपावर गेल्यामुळे तस्करी मोठ्या प्रमाणात होत असल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागण्या मान्य होईपर्यंत माघार घेणार नसल्याचे महसूल कर्मचाऱ्यांनी सांगितले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने तातडीने कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य करून अवैध रेती तस्करीवर आळा घालण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१७-०८-२०२२) :** (१), (२), (३) व (४) गोंदिया जिल्ह्यातील महसूल कर्मचारी संपावर गेल्यामुळे रेती तस्करी झाल्याचे आढळून आलेले नाही. महसूल कर्मचारी संप मागे घेवून कामावर हजर झाले आहेत.

वाळू तस्करीला आळा घालण्याकरीता जिल्हास्तरावर तसेच तालुकास्तरावर भरारी पथकाचे गठन करण्यात आलेले आहे. सन २०२१-२२ व २०२२-२३ मध्ये अवैध गौण खनिज वाहतुकीला आळा घालण्याकरीता करण्यात आलेल्या कार्यवाहीमध्ये एकूण ३३ प्रकरणात ४५.८३ लाख वसुली शासन जमा करण्यात आलेली आहे.

---

## खापरखेडा (जि.नागपूर) क्षेत्रात तहसिलदारावर रेती माफियांनी हल्ला केल्याबाबत

**(११) १४५९७ (२३-०६-२०२२) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खापरखेडा (जि.नागपूर) क्षेत्रात रेती माफियांनी अवैध रेती उत्खनन करीत असताना तहसिलदारांस ट्रॅक्टरद्वारे मारण्याचा प्रयत्न केल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी १६ आरोपींना अटक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यात महसूल विभागातील अधिकाऱ्यांवर वारंवार होणाऱ्या हल्ल्या प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१७-०८-२०२२) :** (१), (२), (३) व (४) दिनांक २५/०४/२०२२ रोजी सकाळी ५.३० ते ६.३० या दरम्यान तहसिलदार, सावनेर यांच्या पथकाने खापरखेडा परिसरातील वलनी वस्ती नजीकच्या कन्हान नदीच्या घाटावर भेट देण्यासाठी जात असताना रेती वाहतूक करत असलेल्या ट्रक्टरची तपासणीस गेलेल्या पथकातील कर्मचारी यांचेवर संबंधित ट्रक्टर चालक यांनी ट्रॅक्टर अगांवर चढवण्याचा प्रयत्न केला व पकडण्यात आलेला सदर ट्रक्टर संबंधित १५ इसमांनी चाकु, लोखंडी रॉड आणि काठ्या यांचा धाक दाखवून सरकारी कर्मचारी यांच्या ताब्यातील ट्रक्टर हिसकावून नेल्याप्रकरणी संबंधीता विरूध्द खापरखेडा पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.०२३०/२०२२ भारतीय दंड संहिता कलम ३७९, ३५२, १४७, १४८, ५०६, १०९ अन्वये गुन्हा दाखल करून संबंधित आरोपीस अटक करण्यात आलेली असून पुढील तपास सुरू आहे.

राज्यात दिनांक ०१/०४/२०२२ ते ३०/०६/२०२२ या कालावधीत शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्यावर हल्ले तसेच अवैध उत्खनन/वाहतूक प्रकरणी ३०९ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

---

## कशेळे (ता.कर्जत, जि.रायगड) गावातील ग्रामीण रुग्णालयामध्ये ३० खाटांची सुविधा उपलब्ध करुन विविध संवर्गातील पदे भरण्याबाबत

**(१२) १४६८५ (२८-०६-२०२२) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कशेळे (ता.कर्जत, जि.रायगड) गावामध्ये सन १९७४ मध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू करण्यात आले असून रूग्णांची वाढती संख्या लक्षात घेता सन १९८६ मध्ये शासनाने प्राथमिक आरोग्य केंद्राचे रूपांतर ३० खाटांच्या ग्रामीण रूग्णालयात करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ग्रामीण रुग्णालयामध्ये २० खाटा उपलब्ध असून मान्यता दिल्याप्रमाणे ३० खाटांची सुविधा उपलब्ध करण्यात आली नसून रुग्णालय सुरु करताना रुग्णालयामध्ये वैद्यकीय अधीक्षक, डॉक्टर, परिचारीका, वॉर्डबॉय व अन्य संवर्गातील मंजूर केलेली पदे भरण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रुग्णालयामध्ये हाडवैद्य व बालरोग तज्ञ असे दोन डॉक्टर उपलब्ध असल्याने अन्य येणाऱ्या विशेष करून आदिवासी बहुल रुग्णांना उपचारापासून वंचित रहावे लागत असून रुग्णालयात स्त्री रोगतज्ञ व भूलतज्ञ यांची पदे रिक्त असल्यामुळे प्रसूतीसाठी येणाऱ्या महिलांना उपचार मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रुग्णालयासाठी दोन रुग्णवाहिका देण्यात आल्या असून त्यातील एक रुग्णवाहिका नादुरुस्त असून दुसरी रुग्णवाहिका चालकाचे पद रिक्त असल्यामुळे बंद आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने ग्रामीण रुग्णालयामध्ये ३० खाटांची सुविधा उपलब्ध करुन विविध संवर्गातील पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१८-०८-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

कशेळे ग्रामीण रुग्णालय हे ३० खाटांचे कार्यरत आहे. सद्य:स्थितीत राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कशेळे ग्रामीण रुग्णालयातील प्रसुतीकक्षाचे व शस्त्रक्रियागृहाचे बांधकाम चालू असल्यामुळे ३० खाटांच्या ऐवजी २० खाटांची सुविधा उपलब्ध आहे.

ग्रामीण रुग्णालयाच्या आकृतीबंधानुसार २७ मंजूर पदांपैकी २२ पदे भरलेली असून, वैद्यकीय अधीक्षक-०१, कनिष्ठ लिपिक-०१, शिपाई-०१ व सफाईगार-०२ अशी ०५ पदे रिक्त आहेत. ग्रामीण रुग्णालय, कशेळे ता.कर्जत, जि.रायगड येथे स्त्रीरोगतज्ञ-०१, अस्थिव्यंग तज्ञ-०१, बालरोग तज्ञ-०१ व दंतशल्यचिकित्सक-०१ ही पदे भरलेली आहेत. भूलतज्ञ नसल्यामुळे आवश्यक भासल्यास उपजिल्हा रुग्णालय, कर्जत येथील भूलतज्ञांना बोलविण्यात येते. रुग्णालयात येणाऱ्या सर्व रुग्णांना उपलब्ध असलेल्या आरोग्य सुविधा पुरविण्यात येतात.

(४) हे खरे आहे.

कशेळे येथे ०२ रुग्णवाहिका असून ०१ रुग्णवाहिका नादुरुस्त असून ती निर्लेखित करण्याची कार्यवाही सुरु आहे. दुसरी रुग्णवाहिका कार्यान्वित आहे. वाहनचालकाचे रिक्त पद भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कशेळे ग्रामीण रुग्णालयातील प्रसुतीकक्षाचे व शस्त्रक्रियागृहाचे बांधकाम दुरुस्तीची कामे पूर्ण झाल्यानंतर रुग्णसेवेसाठी ३० खाटा पूर्ववत करण्यात येतील. रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील रांजणखार डावली आणि मिळकतखार गावांना पाणीपुरवठा करण्याबाबत

**(१३) १४६८९ (०१-०७-२०२२) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील रांजणखार डावली आणि मिळकतखार गावातील १५ पाड्यांना केवळ दोन ट्रकने पाणीपुरवठा होत असल्याचे निदर्शनास आले असून पाणीटंचाईबाबत येथील ग्रामस्थांनी मागील २ वर्षापासून सातत्याने तक्रारी करूनही पाणीपुरवठा विभाग याकडे दुर्लक्ष करीत असल्याने हंडाभर पाण्यासाठी महिलांना वणवण करावी लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रांजणखार डावली आणि मिळकतखार गावातील आदिवासी पाड्यांना भीषण टंचाईला सामोरे जावे लागत असल्याने शासनाने या गावांत जलजीवन योजनेंतर्गत पाणी योजना यापूर्वीच मंजूर केली असतानाही अद्यापी सदरहू पाणीपुरवठा योजनेचे काम सुरूच झालेले नाही, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू मंजूर पाणीपुरवठा योजनेच्या कामास प्रत्यक्षात सुरूवात करण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू नळपाणीपुरवठा योजनेचे काम विनाविलंब हाती घेऊन पूर्ण होण्याच्यादृष्टीने तसेच सद्य:स्थितीत पाणीपुरवठा होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (१६-०८-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.

सदरची गावे एम.आय.डी.सी. च्या उद्धवावरील रेवस झोन क्र. १ प्रादेशिक ग्रामीण नळ पाणीपुरवठा योजनेमध्ये समाविष्ट आहेत. तथापि, ही गावे योजनेच्या शेवटच्या टोकाची असल्याने तसेच एम.आय.डी.सी. च्या पाण्याला आवश्यक तो दाब नसल्याने त्यांना कमी प्रमाणात पाणीपुरवठा होत असल्यामुळे सद्य:स्थितीमध्ये सदर ठिकाणी दोन टँकरने पाणीपुरवठा सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

जल जीवन मिशन अंतर्गत रांजणखार डावली व मिळकतखार या दोन योजनांचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) व (४) सदर योजनेच्या कामास कार्यारंभ आदेश देण्यात आलेले असून सद्य:स्थितीत योजनेची उद्धव विहीर, पंपघर, पाईपलाईन पुरवठा व जोडणी काम झालेली आहेत व सध्या पाऊस सुरु असल्याने उर्वरित कामे तातडीने पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

तसेच सद्य:स्थितीत रांजणखार डावली व मिळकतखार येथे दोन टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत

**(१४) १४७५२ (२८-०६-२०२२) श्री.नागोराव गाणार, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड, श्री.महादेव जानकर, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके : तारांकित प्रश्न क्रमांक ११९३४ ला दिनांक १५ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जाती व नवबौद्धाच्या मुलामुलींकरीता शासकीय उच्चस्तर औद्योगिक प्रशिक्षण संस्था औरंगाबाद, नाशिक, नागपूर व अमरावती येथे सुरु करण्यात आलेल्या संस्थेत ६० कायम व २० तासिका तत्वावर कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रतिमाह वेतन अदा करण्यात येत नसल्याने त्यांची आर्थिक गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांना प्रतिमहा नियमित वेतन मिळावे याकरीता कर्मचाऱ्यांचे वेतन अनिवार्य लेखाशिर्षामधून करण्याच्या (नॉन प्लान) प्रस्तावावर संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय स्तरावरुन कार्यवाही न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रतिमाह वेतन अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा (२२-०८-२०२२) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) सदर कर्मचाऱ्यांचे प्रतिमहा नियमित वेतन अनिवार्य लेखाशिर्षामधून (नॉन प्लान) करण्याबाबतच्या प्रस्तावावर शासनस्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद जिल्ह्यातील कुपोषित बालकांना पोषण आहार मिळण्याबाबत

**(१५) १४७७४ (२८-०६-२०२२) श्री.अंबादास दानवे : तारांकित प्रश्न क्रमांक १२२२६ ला दिनांक ४ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद जिल्ह्यामध्ये ३ हजार १२९ बालके कुपोषित असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून गेल्या दोन वर्षात ० ते ५ वर्षे वयोगटातील बालकांच्या वजन आणि उंचीनुसार त्यांच्या आहाराकडे दुर्लक्ष झाल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा परिषदेच्या महिला व बालविकास विभागाकडून माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये मिळालेल्या माहितीनुसार १४ हजार ५३३ बालके मध्यम कमी वजनाची तर ३ हजार १२९ बालके तीव्र कमी वजनाची असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर जिल्ह्यात एवढया मोठ्या प्रमाणात कुपोषित बालके आढळण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने जिल्ह्यातील कुपोषित बालकांच्या संख्येत वाढ होऊ नये यादृष्टीने कुपोषित बालकांना पोषण आहार मिळण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा (१७-०८-२०२२) :** (१) माहे मे, २०२२ च्या मासिक प्रगती अहवालानुसार, औरंगाबाद जिल्ह्याची कुपोषणाची वर्गवारी खालीलप्रमाणे आहे.

| एकूण वजन घेतलेली बालके | सर्वसाधारण वजनाची बालके | मध्यम कुपोषित बालके | तीव्र कुपोषित बालके |
|---|---|---|---|
| २४५३२६ | २२६२३८ | १५७३६ | ३३५२ |

गेल्या २ वर्षात ० ते ५ वर्ष वयोगटातील बालकांच्या आहाराकडे दुर्लक्ष झालेले नाही. ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालकांना व गरोदर महिला-स्तनदा मातांना नियमित घरपोच आहार (Take Home Ration) सुरु होता. तसेच, कोविड-१९ च्या कालावधीमध्ये ३ वर्ष ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना गरम ताजा आहाराऐवजी Take Home Ration अंतर्गत घरपोच आहार देण्यात येत होता. त्यामुळे आहाराकडे कोणत्याही प्रकारचे दुर्लक्ष झालेले नाही.
(२) माहे फेब्रुवारी, २०२२ च्या मासिक प्रगती अहवालानुसार औरंगाबाद जिल्ह्याची तीव्र कुपोषित बालकांची संख्या ३०९९ आणि मध्यम कुपोषित बालकांची संख्या १४४४१ एवढी आहे.

(३) माहे फेब्रुवारी, २०२२ च्या मासिक प्रगती अहवालानुसार राज्यातील कुपोषणाची टक्केवारी १.२३ आहे आणि औरंगाबाद जिल्ह्याची कुपोषणाची टक्केवारी १.४८ आहे, राज्याच्या सरासरी कुपोषणाच्या तुलनेत औरंगाबाद जिल्ह्याच्या तीव्र कुपोषणाच्या टक्केवारीमध्ये अल्पशी वाढ आहे.

कुपोषणाची कारणे खालीलप्रमाणे आहेत :-

१) गरोदर मातांचे स्थलांतरीत होण्याचे प्रमाण जास्त आहे.

२) बालविवाह

३) विटभट्टीवरील कामगार

४) ऋतुमानानुसार आजार

५) बाळंतपणा वेळेसची गुंतागुंत

६) गरोदर मातेमध्ये सुक्ष्म पोषक द्रव्यांचे प्रमाण कमी असणे

७) वेळेपूर्वी प्रसूती

८) जन्मत: बालकाचे वजन कमी असणे.

(४) कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना राबविण्यात येतात :-

१) ० ते ३ वर्ष वयोगटातील बालकांना आणि गरोदर महिला-स्तनदा माता यांना घरपोच आहार व ३ वर्ष ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना गरम ताजा आहार पुरवठा करण्यात येतो.

२) ग्रामीण भागातील तीव्र कुपोषित बालकांसाठी VCDC सुरु करुन त्यांना श्रेणीवर्धनासाठी EDNF (Energy Dense Nutritious Food) पुरवठा करण्यात येतो.

३) तीव्र कमी वजनाच्या बालकांना अतिरिक्त आहार देण्यात येतो.

४) माता सभा, पालक सभा घेवून बालकांचे आरोग्य व आहार याबाबत समुपदेशन करण्यात येते, गृहभेटी देण्यात येतात.

५) मुठभर धान्य योजना राबवून त्यामधील धान्यातून गोपाळ पंगत उपक्रम राबविण्यात येतो.

६) आरोग्य विभागामार्फत वेळोवेळी बालकांची आरोग्य तपासणी करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## गडचिरोली जिल्ह्यात (बिझनेस कमीटी बचत) बी.सी या कंपनीच्या संचालकाने व्यापाऱ्यांची आर्थिक फसवणूक केल्याबाबत

**(१६) १४८२२ (२८-०६-२०२२) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यात बी.सी (बिझनेस कमिटी बचत) या कंपनीच्या संचालकाने व्यापाऱ्यांची फसवणूक करून लाखो रूपये घेवून प्रसार झाल्याची घटना दिनांक २५ मे, २०२२ ला निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त संचालकाला पकडण्यात पोलिसांना यश आले आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त कंपनीच्या संचालकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१८-०८-२०२२) :** (१) होय.
(२) व (३) सदर प्रकरणातील आरोपींनी गुंतवणूकदारांची अर्थिक फसवणूक केली असल्याने पोलीस स्टेशन, गडचिरोली येथे गु.र.नं. ४१३/२०२२, कलम ४०६, ४२०, ३४ भा.दं.वि. सहकलम ३, ४ महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थामधील हितसंबंधाचे संरक्षण) अधिनियम, १९९९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर प्रकरणातील आरोपी फरार असल्याने विशेष तपास पथक स्थापन करुन गुन्हयांतील आरोपींचा शोध घेण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गडचिरोली जिल्ह्यात मंजूर विहिरीचे बांधकाम पूर्ण केलेल्या लाभार्थ्यांना विहीरीचे अनुदान देण्याबाबत

**(१७) १४८२९ (२७-०६-२०२२) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्ह्यात शेतकऱ्यांना सिंचनाची सोय उपलब्ध व्हावी या हेतुने १३ हजार धडक सिंचन विहीर कार्यक्रम राबवून शेतकऱ्यांना कार्यारंभ आदेश देण्यात आले असून २ वर्षे पूर्ण होऊनही अद्याप विहीरीचे अनुदान शेतकऱ्यांना प्राप्त झाले नसल्याचे दिनांक ३० मार्च,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर मंजूर विहीरीचे बांधकाम पूर्ण केलेल्या लाभार्थ्यांना विहीरीचे अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री.संदीपानराव भुमरे (१७-०८-२०२२) :** (१) हे खरे नाही.
विभागाच्या दिनांक ०७ नोव्हेंबर, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांना सदर कार्यक्रमासाठी रुपये २३.०० कोटी इतका निधी वितरित करण्यात आलेला होता.त्यापैकी गडचिरोली जिल्ह्यासाठी रुपये ३.७४ कोटी तसेच विभागाच्या दिनांक २५ जानेवारी, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये रुपये २.२० कोटी असा एकूण रुपये ५.९४ कोटी इतका निधी गडचिरोली जिल्ह्यासाठी वितरित करण्यात आलेला आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगली जिल्ह्यातील पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालयाच्या इमारतीचे दुरुस्तीचे काम सुरु करण्याबाबत

**(१८) १४८४१ (१२-०७-२०२२) श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालयाच्या इमारतीच्या संरचनात्मक लेखापरीक्षणमध्ये (स्ट्रक्चरल ऑडीट) इमारतीचा तिसरा मजला व शौचालयाचा भाग धोकादायक असल्याची बाब दिनांक १३ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालयाच्या इमारतीच्या धोकादायक भागाच्या दुरुस्तीचे काम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (२३-०८-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर इमारतीचे आयुष्यमान व दुरुस्तीसाठी येणाऱ्या खर्चाचा आढावा घेऊन सदर इमारतीच्या दुरुस्तीसाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कार्ला (जि.पुणे) येथील श्री एकविरा देवी मंदिर व परिसराचा विकास व संरक्षण करण्याबाबत

**(१९) १४९३० (१८-०८-२०२२) श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कार्ला (जि.पुणे) येथील श्री एकविरा देवी मंदिर व परिसराचा विकास व संरक्षण करण्याबाबतचे निवेदन श्री एकविरा आई भक्त भाविक मंडळाने दिनांक ३०/०५/२०२२ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांना दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा (१८-०८-२०२२) :** (१) होय.
(२) (i) श्री एकवीरा मंदिर पायथ्याकडे जाण्याकरीता २.२० कि.मी. रस्त्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत प्रगतीत आहे.

(ii) श्री एकवीरा देवी मंदिर पायथ्याशी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत स्वच्छतागृह व उपहारगृह भाविकांकरीता उपलब्ध करून देण्यात आले आहे तसेच जिल्हा नियोजन समिती, पुणे मार्फत महिला, पुरुष व अपंगांकरीता स्वच्छतागृहाची सुविधा निर्माण करण्यात आली आहे.

(iii) श्री एकवीरा देवी मंदिराचे जतन, संवर्धन व परीसर विकास करण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत रुपये ३९.४३ कोटीचा आराखडा तयार करण्यात आला आहे.

(iv) श्री एकवीरा देवी मंदिर येथे फनिक्युलर ट्रॉली निर्माण करण्याचा प्रस्ताव पर्यटन उपविभाकडे विचाराधीन आहे
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील समुद्र किनारे आणि नदयांमधील प्रदुषणावर नियंत्रण मिळवून नियमित पाणी गुणवत्ता निर्देशांक प्रदर्शित करण्याबाबत

**(२०) १५०११ (०२-०७-२०२२) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील समुद्र किनारे आणि नद्यांमधील पाण्याची गुणवत्ता तपासून प्रदूषण, तसेच प्रदूषणास जबाबदार ठरणाऱ्या माध्यमांवर कारवाई करण्याचे अधिकार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे (एमपीसीबी) असून त्यांनी माहे मे, २०२१ पासून पाणी गुणवत्ता निर्देशांक रोखून ठेवला असून एमपीसीबीच्या संकेतस्थळावर याविषयी कोणतीही माहिती उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील समुद्र किनारे आणि नद्यांमधील पाण्याच्या प्रदुषणात वाढ झाली असून पाण्याच्या शुद्धीकरणावर होणाऱ्या खर्चाबाबतची माहिती लपवली जात आहे, तसेच, पाण्याचे प्रदूषण रोखण्याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ हलगर्जीपणा करीत असून प्रदूषण करणाऱ्यांना प्रशासन मदत करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबईतील समुद्र किनारे आणि नद्यांमधील वाढत असलेल्या प्रदुषणावर नियंत्रण मिळविण्यासाठी तसेच नियमित पाणी गुणवत्ता निर्देशांक प्रदर्शित करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१८-०८-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) समुद्र किनारे व नदी प्रदूषित झाली आहे, हे अंशत: खरे आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेने समुद्र किनारे व नदयांच्या पाण्याचे गुणवत्ता सुधारण्यासाठी एकूण ७ ठिकाणी अद्ययावत सांडपाणी प्रक्रिया सुविधा केंद्रे उभारण्याकरीता माहे मार्च २०२२ रोजी निविदा प्राप्त झाल्या असून त्यांची कामे प्रदान करण्यात आली आहेत.

महाराष्ट्र नियंत्रण मंडळाकडून दरमहा समुद्र किनाऱ्याच्या पाण्याच्या गुणवत्तेचे मोजमाप करण्यासाठी १२ ठिकाणी नमुने गोळा करून त्याचे पृथकरण अहवाल संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.